MHKO100013422016

<u>नियमित दरखास्त क्रमांक २२/२०१६ मधील निशाणी २३ खालील आदेश</u>

दरखास्तदार यांनी प्रस्तुत अर्जानुसार वाद गट नं. ५५८ ची फेरमोजणी उपअधिक्षक भुमीअभिलेख गडहिंग्लज यांचेमार्फत होवून मिळणेसाठी अर्ज केला आहे.

२. अर्ज वाचला. जाबदार यांनी म्हणणे दिलेले नाही. दरखास्तदारतर्फे विधीज्ञ श्री. एस.व्ही. पोवार यांचा युक्तीवाद ऐकला. प्रकरणाचे अवलोकन केले.

३. प्रस्तुतची दरखास्त रे.दि.मु.नं. ७९/२०११ मध्ये निशाणी क्र. २२ प्रमाणे झालेल्या दिनांक २८/०४/२०१४ रोजीच्या तडजोड हुकूमनाम्यावर आधारीत दाखल केलेली आहे. दरखास्तीमध्ये दरखास्तदार यांनी असे कथन केले आहे की, तडजोड झाली असताना जाबदार यांनी फेब्रुवारी २०१६ च्या पहिल्या आठवडयात गट नं. ५५८ च्या पुर्वेकडील बाजूस असलेल्या रस्त्यालगत काटेरी कुंपन, दगडे व इतर साहित्या टाकण्याचा प्रयत्न करुन दरखास्तदार यांच्या गट नं. ५५८ उर्वरित क्षेत्राच्या कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा केला.

४. रे.दि.मु.नं. ७९/२०११ मधील तडजोड हुकूमनामा निशाणी क्र. २२ पाहिला असता त्यामध्ये गट नं. ५५८ च्या पुर्व उत्तर कोप-यातील दक्षिण उत्तर ११.५४ मिटर व पुर्व पश्चिम १३.०० मिटर अशी एकूण १.५ आर क्षेत्र जाबदार यांना देण्यात आलेले आहे. तसेच उर्वरित क्षेत्र ४१.०६ आर हे दरखास्तदार यांच्या मालकीचे व कब्जे वहिवाटीची राहीलेले आहे. या प्रकरणामध्ये दरखास्तदार यांची हरकत आलेने व दरखास्तदार यांनी निशाणी क्र. ७ वर कोर्ट कमिशनर यांची नियुक्ती मागीतलेने पदीय पुर्वअधिकारी यांनी तालुका निरीक्षक भुमी अभिलेख, गडहिंग्लज यांची नियुक्ती केली व त्या आदेशानुसार त्यांना दरखास्तदार यांच्या

मिळकतीच्या उत्तर पुर्व कोप-यातील हद्दीवरील सिमेंटचे पोल व लोखंडी तार उखडून काढले आहे काय त्याबाबतचा स्पष्ट अहवाल मागविण्यात आलेला होता. या प्रकरणामध्ये कोर्ट कमिशनर यांनी निशाणी क्र. २१ वर आपला अहवाल दाखल केला आहे. सदर अहवाल मान्य नसलेने दरखास्तदार यांनी निशाणी क्र. २२ वर त्यावर म्हणणे दाखल केलेले आहे.

५. कोर्ट कमिशनर अहवाल निशाणी क्र. २१ याचा मो.र.नं. ११८ आहे व सदरची मोजणी भुकरमापक श्री. डी.के.मडीलगेकर यांनी दिनांक ०२/०७/२०१८ रोजी करण्यात आलेली आहे. मोजणीदार यांनी अहवाल दिलेला आहे. परंतु त्यामध्ये जाबदार यांच्या क्षेत्राच्या चतुर्सिमा निशाणी क्र. ७ मध्ये नमुद केल्याप्रमाणे कायम केल्याच्या दिसत नाहीत. तसेच गट नं. ५५८ च्या पुर्वेकडील हद्दी कोटून सुरु होता हे स्पष्टपणे नमूद केलेले दिसत नाही. मोजणी नकाशा ब प्रतीमध्ये पुर्व बाजूला हिरव्या रंगामध्ये जे क्षेत्र दाखविले आहे ते रस्त्यामध्ये येत आहे असे नमूद केले आहे. परंतु ते क्षेत्र गट नं. ५५८ मधील आहे किंवा नाही याबाबत स्पष्टपणे खुलासा केलेला नाही. जर सदर क्षेत्र गट नं. ५५८ मध्ये असेल तर जाबदार यांना दिलेले १.५ आर क्षेत्र हे पुर्वेकडील हद्दीपासून मोजणे व त्याप्रमाणे ते क्षेत्र केशरी रंगात दर्शविणे आवश्यक होते परंतु त्याबाबत संदिग्धतः दिसून येते. याशिवाय जाबदार यांचे क्षेत्राचे दक्षिण उत्तर लांबी ११.५४ मिटर इतकी आहे. त्यामुळे गट नं. ५५८ च्या उत्तर पुर्व हद्दीपासून दक्षिण बाजूस ११.५४ मिटर हे अंतर नेमके कुठे येते याबाबत नकाशामध्ये स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक होते परंतु तसा उल्लेख केलेला दिसून येत नाही. तसेच हिरव्या रंगाने दाखविलेले क्षेत्र गट नं. ५५८ मधील असेल तर पुर्वेकडील हद्दीपासून पश्चिमेस १३ मिटरपर्यंत जाबदार यांची हद्द दाखविणे गरजेचे होते व त्यामुळे जाबदार यांचे क्षेत्र निश्चित किती आहे व जाबदार याचे दरखास्तदार यांच्या उर्वरित क्षेत्रामध्ये दक्षिण व पश्चिम बाजूला अतिक्रमण आहे का याबाबी स्पष्ट झाल्या असत्या परंतु त्याप्रमाणे मोजणीदार यांनी स्पष्ट अहवाल दिलेला नाही. त्यामुळे दरखास्तीच्या अंतिम निर्णयासाठी फेर मोजणी करणे संयुक्तीक वाटत आहे.परिणामतः खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

**आदेश**

१. फेरमोजणी अर्ज मंजूर करणेत येतो.

२. मौजे करंबळी येथील गट नं. ५५८ बाबत झालेल्या मो.र.नं. ११८/२०१८ बाबत फेरमोजणी करण्याकामी मा. उपअधिक्षक, भुमी अभिलेख, गडहिंग्लज यांची कोर्ट कमिशनर म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.

३. मोजणीदार यांनी गट नं. ५५८ ची फेरमोजणी करावी व त्यामध्ये संपूर्ण गटाच्या हद्दी व क्षेत्र नमुद करावे.

४. मोजणीदार यांनी गट नं. ५५८ मधील जाबदार यांचे पुर्व उत्तर कोप-यातील दक्षिण उत्तर ११.५४ मिटर व पुर्व पश्चिम १३ मिटर क्षेत्र म्हणजे १.५ आर क्षेत्र हे त्या गटामध्ये कोठून सुरु होते व कोठे संपते याबाबत नकाशात स्पष्ट उल्लेख करावा व त्याचे क्षेत्र हद्दीसह दर्शवावे.

५. वर कलम ४ मध्ये नमुद केल्याप्रमाणे क्षेत्र दर्शविल्यानंतर जाबदार यांनी दरखास्तदार यांच्या उर्वरित ४१.०६ आर क्षेत्रामध्ये अतिक्रमण केले आहे किंवा काय तसेच ते अतिक्रमण कोण कोणत्या दिशेला सदर गटामध्ये आहे याबाबत स्पष्ट उल्लेख करावा.

६. गट नं. ५५८ चे पुर्वेकडील हद्द याची दक्षिण उत्तर लांबी किती आहे हे देखील अहवालात नमुद करावे.

७. मोजणी करताना वर नमुद केल्याप्रमाणे सखोलपणे चौकशी करण्यात यावी व अहवाल दोन महिन्यात सादर करावा.

८. दरखास्तदार यांनी मोजणीकामी निशाणी क्र. ७ ची प्रत व आदेश, निशाणी क्र. २३ च्या अर्ज व आदेशाची प्रत व इतर आवश्यक कागदपत्रे द्यावेत व त्वरीत पुर्तता करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by Maheshkumar Tanajirao Kharade
Date: 2019.10.05 17:17:44 +0530

दिनांक ०५.१०.२०१९

(म. ता. खराडे)
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
गडहिंग्लज